FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.I

पहिली खबर

0154202

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई शहर, पोलीस ठाणे का.प्र.वि., पहिली खबर क्र. ४४, वर्ष २०२३, दिनांक २८/१०/२०२३
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून २५/१०/२३ वेळ १२:००, तारीख पर्यंत २७/१०/२३ वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २५/१०/२०२३, वेळ १२:००
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०१/२०२३, तारीख २८/१०/२३ वेळ ०६:१०
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........ ठिकाणाचे नंबर ........ गल्ली ........ रस्त्याचे नाव ........
मांडवी अग्निशमन केंद्रासमोर, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, वाडीबंदर, मुंबई
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place वाडीबंदर वाहतूक चौकी जवळ, Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव मोहम्मद इमान नुरुद्दीन खान उर्फ सलमान (b) वडिलांचे / ~~पतीचे~~ नाव नुरुद्दीन खान
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय २८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ........
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय पानपट्टी दुकान चालक
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता ........, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रूम नं. १६, पहिला मजला, कमु सुलेमान बिल्डिंग नं. १५०, दुसरा मोहल्ला, नागपाडा, मुंबई ४००००८
रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता वरील प्रमाणे
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
प्रकाश श्रीपाद दळवी, वय ५७ वर्षे, सदा-नोकरी (पोह.चा. ३००३५, नेमणूक मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई), रा.ठी.- फ्लॅट नं. ७३/डी-६, ओमकार सोसायटी, लोकमान्य नगर, ठाणे (प.), जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री. मोहम्मद इम्रान नुरुद्दीन खान उर्फ सलमान, वय २८ वर्षे, धंदा - पानपट्टी दुकान चालक, रा.ठी. - रुम नं. १६, पहिला मजला, कुमु सुलेमान बिल्डींग नं. १५०, हुजरा मोहल्ला, नागपाडा, मुंबई यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र पानावर संगणीकृत करण्यात आला असुन सदरचा जबाब नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी समजण्यात यावी.

मोहम्मद इमरान खॉन
28/10/2021

समक्ष

28/10/2021
(सुप्रिया नरे)
पोलीस निरीक्षक
का.म.वि. मुंबई विभाग,
मुंबई

फिर्यादी दिनांक २७/१०/२०२१

श्री. मोहम्मद इम्रान नुरुद्दीन खान उर्फ सलमान, वय २८ वर्षे, धंदा- व्यवसाय(पानपट्टीचे दुकान), रा.रुम नं १६, पहिला मजला, कम्पु सुलेमान बिल्डींग, बिल्डींग नं १५०, हुजरा मोहल्ला, नागपाडा, मुंबई ४००००८, मो. क्र. ९९६७७८७३११/९८१९४८७३११

.........

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी माझ्या कुटुंबियासमवेत राहवयास आहे. माझी वाशील खान मार्ग, बादशाह चेंबर, सुन्नी मोहल्ला, हयात मेडीकल समोर, दोन टाकी, नागपाडा, मुंबई या ठिकाणी पानपट्टीचे दुकान असून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझे कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

मी गेल्या दोन वर्षापासून गुटखा पान मसालाचा विक्री करण्याचा व्यवसाय करीत होतो. परंतु फेब्रुवारी २०२१ मध्ये गुटख्याचा व्यवसाय करीत असल्यामुळे माझ्याविरूध्द सर जे जे मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३७/२०२१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्यानील अटकेतुन जामीन मंजुर झाल्यानंतर मी माझा चालु असलेला गुटख्याचा व्यवसाय बंद करून वाशील खान मार्ग, बादशाह चेंबर, सुन्नी मोहल्ला, हयात मेडीकल समोर, दोन टाकी, नागपाडा, मुंबईया ठिकाणी पानपट्टीचे दुकान चालवित आहे. तसेच माझे मित्र सालीम भाई यांचे पूर्ण नाव श्री अबु सालीम शमीम अहमद खान असून ते देखील सुरूवातीला गुटखा पान मसाला विक्रीचा व्यवसाय करीत होते. परंतु सध्या सदरचा व्यवसाय बंद करून इमामवाडा रोड, डोंगरी, मुंबई येथे बाबा जलेबी नावाचे स्विट आणि चाटचे दुकान चालवितात.

साधारण दोन महिन्यांपुर्वी मला माझ्या मोबाईल क्र.९९६७७८७३११ या नंबरवर एका प्रकाश दळवी नामक इसमाचा कॉल आला. नमूद इसमाने मला त्यांची ओळख प्रकाश दळवी पीएसआय असल्याचे सांगून माझ्या गुटख्याच्या कामासंदर्भात भेटण्यास बोलाविले. त्यावेळी मी माझ्या तब्येतीचे कारण सांगून सदरची गोष्ट टाळली. त्यानंतर दळवी साहेबांनी माझे मित्र सालीम भाई यांना त्यांचा मोबाईल क्र. ९८९२४७१२३८ वर संपर्क साधून मला व त्यांना एकत्र भेटण्यास बोलाविले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी माझे मित्र सालीम भाई यांच्यासोबत डोंगरी येथे त्यांना भेटण्याकरिता गेलो. त्यावेळी त्यांनी मला व सालीम भाई यांना ते पोलीस असुन सी.पी. ऑफिस मध्ये कार्यरत असल्याचे सांगुन **'मेरे ऑर्डरपर एस.एस.ब्रांच में टीम निकलती है। दोन लाख गुडलक और पचास हजार महिना स्टार्ट करो। बिंदास काम करो।'** असे आम्हाला सांगितले. तसेच सी पी ऑफिस मधील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे ते विश्वासातील असून त्यांच्या सांगणेप्रमाणे कारवाई केली जाते असे दळवी साहेबांनी आम्हांला सांगितले. त्यावेळी मी माझे काम बंद असलेबाबत सांगून पैशाची व्यवस्था करू शकत नसलेबाबत दळवी साहेबांना सांगितले. तेव्हा दळवी साहेबांनी मला व माझे मित्र सालीम भाई यांना **'सब कुछ मेरे हाथ में है। मैं कही भी रेड करूंगा उसमें तुम्हारा नाम डालुंगा।'** अशी धमकी दिली. त्यावेळी मी व सालीम भाई असे आम्ही दोघानी पैशांची व्यवस्था करण्यासाठी काही दिवसांचा कालावधी मागितला.

त्यानंतर अंदाजे दहा दिवसांपूर्वी प्रकाश दळवी साहेबांनी सालीम भाई यांच्या मोबाईलवर फोन करून मला व सालीम भाई यांना क्रॉफर्ड मार्केट येथील जनता हॉटेल मध्ये भेटावयास बोलाविले. त्यानुसार मी व सालीम भाई दळवी साहेबांना भेटण्याकरिता जनता हॉटेल, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई येथे गेलो असता, सदर ठिकाणी दळवी साहेबांनी पुन्हा पैशाबाबत विचारणा केली. नमूद वेळी आमच्या वैयक्तिक अडचणीमुळे एवढयात पैशाची व्यवस्था होवू शकत नसलेबाबत त्यांना सांगितले असता, त्यांनी गुडलक म्हणून रू. १,००,०००/- व रू. २५,०००/- महिना देण्याबाबत सांगितले. त्यावेळी पैशाची व्यवस्था करण्याकरिता आम्ही काही दिवसांची मुदत मागितली. मला व माझे मित्र सालीम भाई यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी व माझे मित्र सालीम भाई दिनांक २५/१०/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्याकरीता आलो. तेथे आल्यानंतर माझी तक्रार तेथील वरिष्ठांना सांगितली व वरिष्ठांनी पो.नि. सुप्रिया नटे यांना बोलावून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे या मला घेवुन त्यांचे केबिनमध्ये गेल्या. पो.नि. नटे यांनी त्यांचे केबिनमध्ये उपस्थित असलेले

मोहम्मद इमरान खॉन



Scanned with OKEN Scanner

सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री सरदार नाळे यांची ओळख मला करून दिली व ते माझे तक्रारीचे कारवाई दरम्यान देखरेख अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि. नटे यांनी माझे तक्रारीबाबत विचारपुस करून मला माझी तक्रार लेखी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे हस्ताक्षरात प्रकाश दळवी यांनी गुडलक म्हणून रू. १,००,०००/- व प्रति महिना रू. २५,०००/- लाचेच्या मागणीविरूध्द कारवाई होणेकरिता लेखी तक्रार अर्ज पो.नि. सुप्रिया नटे यांचेकडे दिला. पोनि सुप्रिया नटे यांनी मला त्यादिवशी पडताळणी कारवाई शक्य नसल्यामुळे दुसऱ्या दिवशी दि. २६/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. च्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे बोलाविले.

दि. २६/१०/२०२१ रोजी माझी तब्बेत ठिक नसल्यामुळे दुपारी १४.१५ वा. च्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो. सदर वेळी पोनि सुप्रिया नटे यांनी दळवी साहेब यांना प्रत्यक्ष भेटून पडताळणी कारवाई करण्यात येणार असलेबाबत सांगितले. परंतु दळवी साहेब प्रत्यक्ष भेटून बोलण्याऐवजी फोनवर बोलतात याबाबत मी पोनि सुप्रिया नटे यांना सांगितले. त्यामुळे प्रत्यक्ष भेट घेण्याऐवजी मोबाईल फोनवरील संभाषणाद्वारे पडताळणी करण्यात येणार असलेबाबत पोनि सुप्रिया नटे यांनी मला व पंचाना सांगितले. त्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मी माझे मोबाईल क्र. ९९६७७८७३११ वरून दळवी साहेब यांचा मोबाईल क्र. ८४५४८८९३११ यावर कॉल केला असता, त्यांनी कॉल उचलला नाही. काही वेळाने त्यांचा माझे मोबाईलवर कॉल आला असता, सदर कॉल मी उचलला व मोबाईलचा स्पिकर ऑन केला. नमूद वेळी झालेल्या संभाषणादरम्यान दळवी साहेब यांनी प्रथम "**अगर होता है तो ठिक है... जो बात हुआ है अगर होता है तो ठिक है...**" असे म्हणून लाचेची मागणी करून लाच देण्याबाबत सुचित केले. त्यानंतर त्यांनी मला सलीम भाई यांच्याशी संपर्क करून बोलण्यास सांगितले. ते माझ्याकडे स्पष्टपणे लाचेची मागणी करीत नसून सालीम भाई यांच्याशी स्पष्टपणे बोलतील याची मला खात्री असल्यामुळे मी पोनि सुप्रिया नटे यांना सांगून सालीम भाई यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी येथे बोलाविण्यास सांगितले. त्याप्रमाणे काही वेळानंतर सालीम भाई हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी हे या कार्यालयात येवून पोनि सुप्रिया नटे यांना भेटले. त्यावेळी त्यांनी दळवी साहेब हे व्हॉटसअप कॉलवरच बोलतात असे मला व पोनि सुप्रिया नटे यांना सांगितले. त्यामुळे पुढील पडताळणी दरम्यान सालीम भाई यांच्या मोबाईल क्र.९८९२४७१२३८ वरून प्रकाश दळवी यांच्या मोबाईल क्र. ९१३६३५४५६९ वर व्हॉटसअप कॉल करण्यात आला.

वरनमुद प्रमाणे झालेल्या व्हॉटसअप कॉलवरील संभाषणादरम्यान माझे मित्र सालीम भाई यांनी दळवी साहेबांना सांगितले की, ते मला भेटण्यास आले आहेत. त्यावेळी सालीम भाई यांनी त्यांच्याकडे माझे व दळवी साहेबांमध्ये झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता, त्यांनी "**उसको क्लीअर बोल दिया मैने** ',जो... **जो बात हुई... वो... वही होना चाहिये...** "असे म्हणुन अगोदर ठरल्याप्रमाणेच रक्कम द्यावी असे मला सांगितल्याचे त्यांनी सालीम भाई यांना फोनवर सांगितले. त्यावेळी सालीम भाई यांनी माझी तब्बेत ठिक नसल्यामुळे लाचेची रक्कम कमी करणेबाबत दळवी साहेबांना विनंती केली असता, त्यांनी त्यावेळी '**सेव्हंटी फाईव हो गया ना पूरा** ' असे म्हणुन पंचाहत्तर हजार रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली व सदरची रक्कम सालीम भाई यांना माझ्याकडून घेवून आज रोजी प्रकाश दळवी साहेबांना देण्यास सांगितले. नमूद संभाषणदरम्यान मी स्वत: दळवी साहेबांशी सदर चालू असलेल्या मोबाईल व्हॉटसअप कॉलवरून बोललो असता, त्यांना मी माझी रू. २५,०००/- रकमेची व्यवस्था झाली असल्याचे सांगितले असता, त्यांनी "**हा हा...**" म्हणून सदरची रक्कम सालीम भाई यांच्याकडे देण्यास सांगितले. वरील दोन्ही संभाषण मोबाईल स्पिकर ऑन करून डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आले असून त्याबाबत पडताळणी पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांच्या सांगणेप्रमाणे आज रोजी दुपारी १२.४५ वा. च्या सुमारास मी व सालीम भाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे येवून पोनि सुप्रिया नटे यांना भेटलो. नमूद वेळी सालीम भाई यांनी प्रकाश दळवी हे त्यांना पैसे देण्याचे ठिकाण मोबाईलवर फोन केलेनंतर सांगणार असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रथम सालीम भाई यांनी त्यांच्या मोबाईल क्र.९८९२४७१२३८ वरून प्रकाश दळवी यांच्या मोबाईल क्र. ९१३६३५४५६९

मोहम्मद इमरानखान



Scanned with OKEN Scanner

वर व्हॉटसअप कॉल केला. नमूद वेळी झालेल्या संभाषणादरम्यान दळवी साहेबांनी ते साधारण तीन ते साडे तीन वाजेपर्यंत आम्हांला भेटण्याकरिता वाडी बंदर येथे येणार असल्याचे सांगितले. तसेच नमूद संभाषणादरम्यान मी दळवी साहेबांना मी कमी पैशाची व्यवस्था केल्यामुळे नाराज न होणेबाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी **"अगले महिने मै उसका कव्हर करो... "** असे म्हणून उर्वरित रक्कम पुढील महिन्यात पूर्ण करणेबाबत मला सांगितले. तसेच माझे पुर्वीचे गुटख्याचे काम पुन्हा सुरू करू किंवा कसे? याबाबत त्यांना विचारणा केली असता, त्यांनी मला **"यहॉं तक कोई भी आयेगा नही, मै उसको संभाल लूंगा...** असे म्हणून मला आश्वस्त केले. सदर वेळी माझेवर अगोदरच गुन्हा नोंद असून पुन्हा असा गुन्हा नोंद होणार नाही ना याबाबत भिती व्यक्त केली असता, असे काही होणार नाही असे सांगून पुढील महिन्यात पुन्हा पैसे द्यावे लागतील असे त्यांच्या बोलण्यातून सुचित केले. नमूद झालेले सर्व संभाषण मोबाईल स्पिकर ऑन करून डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आले. नमूद वेळी दळवी साहेब यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देणेकरिता लगेचच वाडी बंदर येथे बोलाविले असल्यामुळे त्वरीत सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे पोनि सुप्रिया नटे यांनी सांगितले. त्यावेळी सालीम भाई त्यांचे महत्वाच्या कामाकरिता पोनि सुप्रिया नटे यांना सांगून सदर ठिकाणावरून निघून गेले. नमूद वेळी ते परस्पर दळवी साहेब आल्यानंतर वाडी बंदर फायर ब्रिगेडजवळ मला भेटतील असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर पोनि नटे यांनी मी लाच देण्याकरिता रक्कम सोबत आणली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी माझ्या बचतीतील रोख रक्कम रू. ५०,०००/- (रू. २,०००/- दराच्या २५ भारतीय चलनी नोटा) पो.नि. नटे यांचे समक्ष सादर केले. त्यानंतर पो.नि. नटे यांनी मला व पंचांना लाचेकरिता दयावयाचे रक्कमेस अॅथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोह २९४४७/देसाई यांना बोलावून मला व पंचांना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगून प्रात्यक्षिक दाखविण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी सोबत आणलेल्या पेटीतून एक डब्बा बाहेर काढून अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म मला पंचांसमक्ष समजावुन सांगितले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी लोकसेवक प्रकाश दळवी यांनी लाचेची रक्कम स्वीकारून स्वत:कडे ठेवल्यास उजव्या हाताचे बोट उजव्या कानामध्ये घालून बोटाने कान हलविणे असा लाच स्वीकारलेबाबतचा पोलीस पथकास दिसेल अशा पध्दतीने वारंवार इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक दळवी यांस रंगेहात पकडतील असे सांगितले व सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेच्या आवश्यक त्या सुचना मला व पंच श्री. चौखंडे यांना दिल्या. त्यानंतर पोह देसाई यांनी पंचासमक्ष लाचेच्या रकमेस अॅथ्रासिन पावडर लावली व सदरची रक्कम मी घातलेल्या राखाडी रंगाच्या कुर्त्याच्या उजव्या खिशात ठेवली. पो.नि. नटे यांनी यापुढील कारवाईत पोह देसाई सहभागी असणार नाहीत असे मला व पंचांना सांगितले.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आवश्यक कारवाई पुर्ण करून माझे तक्रारीचे अनुषंगाने सापळा कारवाई करण्याकरिता मी, पंच व पोलीस पथक असे दोन पोलीस वाहनातून वाडी बंदर येथे जाण्याकरिता रवाना झालो. त्यानंतर वाडी बंदर जवळ कोणालाही संशय येणार नाही अशा प्रकारे पोलीस वाहने थांबवून दळवी साहेब येण्याची वाट पाहत थांबलो. काही वेळाने माझे मित्र सालीम भाई यांनी मला मोबाईलद्वारे फोन करून दळवी साहेब एक तासात येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे मी, पंच व पोलीस पथक हे सदर ठिकाणी दोन्ही वाहने काही अंतरावर कोणासही संशय येणार नाही असे थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने सालीम भाई यांनी मला फोन करून दळवी साहेब पंधरा मिनीटांमध्ये वाडी बंदर फायर ब्रिगेड जवळ येणार असल्याचे सांगितले. सदर बाबत मी पंचासमक्ष पोनि सुप्रिया नटे यांना सांगितले असता, पोनि सुप्रिया नटे यांनी मला व पंच क्र. १ चौखंडे यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पो.नि. नटे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पोना गवगणे यांच्या मदतीने माझे कुर्त्याच्या आतील बनियनला लावले. त्यानंतर मी पंच श्री. चौखंडे यांचेसह दळवी साहेबांची भेट घेण्याकरिता पायी चालत वाडी बंदर येथील मांडवी फायर ब्रिगेड गेट जवळ गेलो असता, तेथे दळवी साहेब हे इर्टिगा गाडीने आले. त्यांचेशी चर्चा चालू असताना सालीम भाई हे देखील सदर ठिकाणी आले. चर्चा चालू असतानाच मी माझी तब्येत ठीक नसल्याचे सांगितल्याने दळवी साहेबांनी मला सलीम भाई व माझे सोबतचे पंच श्री चौखंडे यांना त्यांचे इर्टिगा गाडीमध्ये बसण्यास सांगितले. नमूद वेळी दळवी साहेबांनी पैशाबाबत विचारणा केली. मी त्यांना रूपये पन्नास हजारच आणल्याचे लोकसेवक यांना सांगितले.

मोहम्मद इमरान खान



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्री. मोहम्मद इम्रान नुरूद्दीन खान उर्फ सलमान यांची दिनांक २७/१०/२०२१ रोजीची फिर्याद....

त्यावेळी दळवी साहेब यांनी पंच्याहत्तर हजार रूपये ठरले असताना देखिल पुर्ण रक्कम का दिली नाही याबाबत विचारणा करून आणलेली रक्कमही परत नेण्यास सांगितले. त्यावेळी मी व माझे मित्र सालीम खान असे आम्ही उर्वरीत रक्कमेची देखिल लवकरच व्यवस्था करतो असे आश्वासन दळवी साहेबांना दिल्यामुळे नमुद रक्कम स्विकारण्यास तयार झाले. त्यावेळी मी माझ्या राखाडी रंगाच्या कुर्त्याच्या उजव्या खिशामध्ये ठेवलेली रक्कम उजव्या हाताने काढून दोन्ही हाताने देवू केली असता, त्यांनी सदरची रक्कम सालीम भाई यांच्याकडे देण्यास सांगून सालीम भाई यांना ती गाडीच्या डॅशबोर्ड ड्रॉव्हर मध्ये ठेवण्यास सांगितली. तेव्हा सालीम भाई यांनी दळवी साहेबांच्या सांगण्याप्रमाणे सदरची रक्कम घेवून कारच्या डॅशबोर्ड ड्रॉव्हरमधील चष्म्याच्या बॉक्सवर ठेवली. मी व पंच श्री चौखंडे कारच्या बाहेर येवून पोलीस पथकास पूर्वनियोजित इशारा केला.

त्यावेळी पोलीस पथकाने सदर ठिकाणी येवून लोकसेवक श्री दळवी यांना रू. ५०,०००/- लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर मला पोना रावराणे यांनी एका बाजूस नेवून व्हॉईस रेकॉर्डर काढून तो पो.नि. नटे यांचेकडे दिला व त्यांनी तो बंद करून स्वत:कडे ठेवला व मला बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. नटे यांनी दळवी साहेब यांना स्वत:ची, सपोआ सरदार नाळे व पोलीस पथकाची ओळख सांगून त्यांना ताब्यात घेतल्याबाबतचे कारण सांगुन त्यांचे नांव व पत्त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नांव श्री. प्रकाश श्रीपाद दळवी, वय ५७ वर्षे, पद.- पो.ह.चा.क्र. ३००३५, नेमणूक-मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई प्रतिनियुक्तीवर संकिर्ण विभाग येथे कार्यरत असून ड्रोन वाहनावरील चालक रा.ठी. ओमकार सोसायटी, फ्लॅट न.७३, डी/०६, लोकमान्य नगर, ठाणे वेस्ट असे सांगितले.

त्यानंतर जवळ असलेल्या वाडीबंदर येथील वाहतूक चौकीमध्ये जावून हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई पूर्ण करण्यात आली. सदर ठिकाणी सापळा कारवाईच्या अनुषंगाने अपुरी जागा असल्याने तसेच कारोना संसर्गजन्य आजारामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावून करण्यात येणार असल्याचे सपोआ नाळे यांनी सांगितले.

त्यानुसार मी, पंच, लोकसेवक दळवी व पोलीस पथक असे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

माझे मित्र अबु सालीम शमीम अहमद खान व मलायांना लोकसेवक प्रकाश दळवी हे पोलीस हवालदार असताना त्यांनी ते पोलीस अधिकारी असल्याचे भासवुन व मी पी ऑफिस येथे कार्यरत असल्याचे सांगून आमच्या पानपट्टी दुकानातील गुटख्याचे वेगवेगळे पध्दतीचे पान मसाले विक्री करणेबाबत कोणतीही कायदेशीर कारवाई होवू नये म्हणून गुड लक म्हणून रू. १,००,०००/- इतकी लाचेची मागणी करून पडताळणी दरम्यान तडजोडअंती रू. ७५०००/- इतकी लाच स्विकारण्याचे मान्य केले. व दि. २७/१०/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान सदर रकमेपैकी रू. ५०,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक प्रकाश श्रीपाद दळवी यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक प्रकाश श्रीपाद दळवी यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावून सांगून ती मी वाचून पाहिली असता मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

मोहम्मद इमरान खॉन

समक्ष,

( सुप्रिया नटे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

रोख रक्कम रु. 50,000/- (रु. 2,000/- च्या 25 भारतीय चलनी नोटा)

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .......... रु. 50,000/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील कानुस जमद नारीश शेख व ठिकाणी कॉलम नं. 4 मधील प्रमाणे यांनी ते प्रतिनियुक्तीवर ड्रोन ड्राईव्हर चालक म्हणुन कार्यरत असताना त्यांच्या पोलीस आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या ओळखीचा गैरफायदा घेऊन स्वत: पोलीस हवालदार असताना फिर्यादीवर दबाव टाकून सरकारी पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या फायद्याकरीता फिर्यादी व त्यांचे मित्र यांच्याकडून पानपट्टीच्या दुकानातील गुटख्याचे केसेस दत्तीचे पानमसाले विक्री करण्याबाबत कोणतीही कायदेशीर कारवाई होऊ नये म्हणुन गुडलक म्हणुन रु. 1,00,000/- इतकी लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 75,000/- इतकी लाच स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कारवाई दरम्यान सदर रक्कमेपैकी रु. 50,000/- इतकी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन भ्र.प्र. अधि. 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक सुप्रिया नटे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. मोहम्मद इमरान खॉन 28/10/2021
तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

28/10/2021
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name सुप्रिया नटे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1 न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी इमरान खॉन 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner